अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

## भारतमाता नगरात इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** कुमठा नाका परिसरातील भारत मातानगरात राहणाऱ्या एका ५० वर्षीय इसमाने राहत्या घरासमोरील बांधकामाच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी सायंकाळच्या सुमारात उघडकीस आली.

व्हनप्पा लक्ष्मण बेरे (वय ५ रा.भारतमाता नगर, कुमठा नाका) असे मयताचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास त्याने घरासमोर चालू असलेल्या बांधकामाच्या खोलीत लाकडी वाशाला गमजाच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून लक्ष्मण (मुलगा) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

**खिडकीला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या**

**सोलापूर :** न्यू बुधवार पेठेत राहणाऱ्या सचिन विलास शिरसाट (वय ३५) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी सकाळच्या सुमारात उघकिस आली.

बुधवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील खिडकीच्या लोखंडी हँडलला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.



# राजकारण तापले



बदलापूर प्रकरण

## ● वडेट्टीवार भडकले, ॲड.निकम कडाडले ● आघाडीने बंद पुकारले

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**बदलापूरमधील संतापजनक प्रकार उघडकीस आल्यानंतर सारा महाराष्ट्र अस्वस्थ झालेला असताना आपल्या राजकारण्यांनी लोक शाहीचे संकेत मोडून काढत या प्रकरणाचे राजकीय भांडवल करण्याचा उद्योग चालवला आहे. त्याबद्दल प्रत्येक मराठी माणसाच्या मनात चीड उत्पन्न होते आहे. बदलापूरच्या नामांकित शाळेत झालेल्या लहान मुलींवर लैंगिक अत्याचार घटनेचा खटला चालविण्यासाठी राज्य शासनाकडून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती झाल्यानंतर विधान सभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी त्याला विरोध दर्शवला. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात राजकीय संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. आपल्या नियुक्तीला विरोध होताच निकम हे कडाडले आणि काँग्रेसच्या नीतीची चिरफाडच करून टाकली. वडेट्टीवारांची टीका उज्वल निकमांनी खोडून काढताना काँग्रेसच्या नेत्यांनी अतिरेक्यांची वकीलपत्रे घेतल्याचे उदाहरण देवून काँग्रेसवर जोरदार शाब्दिक हल्ला चढवला.**

निकम यांच्या नियुक्तीची वार्ता समजताच वडेट्टीवर म्हणाले की, ज्यांनी भाजपच्या चिन्हावर लोकसभा निवडणूक लढवली, ते भाजपशी संबंधित शिक्षणसंस्थेत झालेल्या अत्याचाराची चौकशी कसे करणार? उद्या हे प्रकरण दाबले गेले तर त्याला जबाबदार कोण? असे प्रश्न विचारून निकम यांच्या नियुक्तीस त्यांनी विरोध केला. निकम यांच्याऐवजी दुसऱ्या वरिष्ठ वकिलाची नेमणूक व्हावी, अशी मागणी वडेट्टीवार आणि अंधारे यांनी केली. वडेट्टीवार यांनी सरकारी वकिल उज्ज्वल निकम यांच्याकडे केस देण्यामागे कारण काय असा प्रश्न उपस्थित केला.

याविषयी एका मराठी न्यूज चॅनलला प्रतिक्रिया देताना निकम यांनी वडेट्टीवर यांच्या भूमिकेवर कडाडून टीका केली. १९९३ च्या बॉम्बस्फोट प्रकरणात एका अभिनेत्याला वाचवण्याचा देखील प्रयत्न झाला आहे, माझ्याकडे आणखीही बरीच माहिती आहे असा पलटवार निकम यांनी केला.

निकम पुढे म्हणाले, विरोधी पक्ष नेत्याांना किती काळजी हे दिसत आहे. जिभेला हाड नसते असे म्हणतात पण तरी देखील काहीजण बेताल आणि बेछूट आरोप करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. करकरे यांचा मृत्यू कसाब याच्या गोळीबारात झाला असे न्यायलयाने सांगून देखील वडेट्टीवार म्हणाले होते की करकरेंचा मृत्यू गोळीबारात झाला नव्हता. त्यावेळी त्यांचा पक्ष म्हणाला होता की, ती आमची भूमिका नाही. दरम्यान पॉक्सो कायद्याअंतर्गत अधिनियम करावे लागतील, शक्ति विधेयकाचंही कायद्यात रूपांतर झाले पाहिजे अशी अपेक्षा विशेष सरकारी वकील निकम यांनी व्यक्त केली.



### बदनाम करण्याचा डाव



चिमुरड्यांवर झालेल्या अत्याचाराची घटना दुर्दैवी आहे परंतु घटनेच्या निषेधार्थ झालेले आंदोलन राजकीय दृष्टीने प्रेरित होते. आंदोलनात स्थानिक लोक असायला हवे होते. तिथे स्थानिक लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतपत होते. बाकी सगळे आंदोलक बाहेरचे होते. इतर ठिकाणांवरून गाड्या भरून लोक येत होते. सरकारला बदनाम करण्यासाठी मंगळवारी बदलापूरमध्ये आंदोलन झाले, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी केला. आंदोलकांच्या हातात लाडकी बहीण योजनेविरोधातले बॅनर कसे काय आले? असा सवालही त्यांनी विचारला. बदलापूरकरांनी मंगळवारी 'बदलापूर बंद'ची हाक दिली होती. मात्र, सकाळी सहाच्या सुमारास हजारोच्या संख्येने जमलेल्या जनसमुदायाला शाळा प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने लोकांच्या संतापाचा उद्रेक झाला. हाच उद्रेक राजकीय प्रेरित असल्याचे शिंदे म्हणाले.

### माझ्याकडे बऱ्याच गोष्टी

मी राजकीय पक्षाकडून निवडणूक लढलो. त्यांच्या पक्षाचे दिग्गज वकील अतिरेक्यांचे वकीलपत्र होतात. १९९३ चा खटला मी चालवत होतो. तेव्हा त्यांच्या पक्षाचे नेते किती आटापिटा करत होते. कोणत्या अभिनेत्याला वाचवण्याचा प्रयत्न त्यावेळी होत होता. माझ्याकडे बऱ्याच गोष्टी आहेत, असेही निकम म्हणाले.

### शनिवारी महाराष्ट्र बंद

बदलापूर घटनेत सरकारकडून कारवाईत दिरंगाई होत आहे तसेच याप्रकरणावर सरकारकडून येणाऱ्या प्रतिक्रिया दुर्दैवी असल्याचे सांगत बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीकडून २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत बुधवारी बैठक झाली. त्यात राज्यातील महिला सुरक्षा प्रश्नावर दीर्घ चर्चा झाली. गेल्या १० वर्षात महिला असुरक्षिततेचे वाढते प्रश्न आणि बदलापूर प्रकरणावर सरकारच्या भूमिका संवेदनशील नसल्याचे सांगत महाआघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली.

### राऊतही मैदानात

निकम यांच्या टीका करण्यासाठी उद्धव ठाकरे यांचे राईट हँड असणारे संजय राऊत हेही मैदानात उतरले.शक्षण संस्था आणि वकील एकाच पक्षाशी संबंधित असल्याचा आरोप वडेट्टीवारांनी केलाय, तर एसआयटी, फास्ट ट्रॅक ही फक्त बोलण्याची भाषा. निकम हे भाजपचेच आहेत ते आता वकील राहिलेले नाहीत. अशी टीका संजय राऊतांनी केली आहे.

## ४ लाखांना मित्राला गंडविले

**सोलापूर :** अडचणीत असलेल्या मित्राला मदत केली. मात्र त्याने पैसे परत न करता ४ लाख ४९ हजाराची फसवणूक केली. ही घटना आंदेवाडी (ता. अक्कलकोट) येथे घडल्याचे नुकतीच उघडकीस आले. या संदर्भात संतोष मल्लिकार्जुन जिरगे (वय ४८ रा.जेऊररोड अक्कलकोट) यांनी अक्कलकोट दक्षिण पोलिसात फिर्याद दाखल केली.

त्याप्रमाणे पोलिसांनी महेबुब युसूफ मुल्ला (रा.आंदेवाडी ता. अक्कलकोट) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. जिरगे आणि मुल्ला हे दोघे मित्र असल्यान त्यांच्यात आर्थिक व्यवहार चालत होता.

दरम्यान मुल्ला याचे ट्रॅक्टर २०२२ साली साखर कारखान्यात लावले होते यावेळी कामगारांना पैसे देण्याकरिता जिरगे यांनी त्याला मदत केली होती. तसेच शेतीकामासाठी वेळोवेळी जिरगे यांनी नोव्हेंबर २०२३ पर्यंत मुल्ला यात ४ लाख ४८ हजार रुपये ९ रुपये दिले होते.जिरगे यांना पैशाचे अडचण आल्याने त्यांनी मुल्ला यास पैशाचे मागणी केली. त्याने आज देतो उद्या देतो असे म्हणत टाळाटाळ करून फसवणूक केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

## रमेश कदम मोहोळच्या मैदानात उतरणार

जयंत पाटील यांची घेतली भेट

**मोहोळ/प्रतिनिधी**

मोहोळ विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत माजी आमदार रकेश कदम हे उतरणार आहेत.त्याबाबतची घोषणा त्यांनी मंगळवारी केली.कदम यांनी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी ही घोषणा केल्यामुळे त्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

कदम पुढे म्हणाले की, सध्या मी कोणत्याही पक्षाच्या नेतृत्वाखाली काम करत नाही. पण मोहोळ विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढणार आहे. याबाबत मतदारसंघातील लोकांशी बोलणार असल्याचेही ते म्हणाले. राजकारणात अशी ऑफर सांगायची नसते असेही कदम म्हणाले.



मी राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून पक्षात होतो. आता केवळ जयंत पाटील यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी आलो होतो असेही कदम म्हणाले. २०१९ साली मी तुरुंगात होतो. तेव्हा मला २४ हजार मत मिळाली होती असेही कदम म्हणाले. मी सध्या जामिनावर बाहेर आहे. मी मोहोळ मतदारसंघातून निवडणूक लढणार असल्याचे कदम म्हणाले.

### कदमांच्या भेटीवर जयंत पाटील काय म्हणाले?

दरम्यान, रमेश कदम यांच्या भेटीबद्दल जयंत पाटील यांना देखील प्रसारमाध्यमांनी विचारले. यावेळी जयंत पाटील म्हणाले की, यापूर्वी देखील ते दोन तीन वेळा भेटले होते, एवढीच प्रतिक्रिया पाटील यांनी दिली.

### कोण आहेत रमेश कदम?

कदम हे २०१४ साली राष्ट्रवादीच्या तिकिटावर मोहोळमधून निवडून आले होते. निवडून आल्यानंतर त्यांनी मागेल त्याला टँकर, मागेल त्याला शेततळे आणि मागेल त्या ठिकाणी रस्ता दिल्याने चांगलेच लोकप्रिय झाले.

## महापालिका सहाय्यक आयुक्तपदी सुरवसे यांची नियुक्ती

**सोलापूर :** महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तपदी अर्जुन संजय सुरवसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने बुधवारी ७० अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केले त्यामध्ये सुरवसे यांचा समावेश आहे. यापूर्वी ते मुख्याधिकारी या पदावर कार्यरत होते.

सोलापूर महापालिकेत सहाय्यक आयुक्तांची एकूण बारा पदं आहेत. त्यापैकी सहा पदं ही शासन नियुक्त आहेत. उर्वरित सहा पदांवर स्थानिक अधिकाऱ्यांना बढती देऊन नियुक्ती करता येते. हे अधिकार सर्वसाधारण सभेला आहेत. अर्जुन सुरवसे यांची नियुक्ती शासनाकडून झाली आहे.

लातूर महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदी निर्मला नेताजी माने यांची तर माळशिरसच्या मुख्याधिकारी पदावर कल्याण पंढरी हुलगे यांची नियुक्ती झाली आहे. बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना तातडीने रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## वेणेगाव जि.प.शाळेच्या आवारात महिलेस मारहाण

**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

शाळेतून मुलास हाकलून दिले. त्याच्या जाब विचारण्यास आलेल्या आईस काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करण्यात आली. ही घटना वेणेगाव (ता.माढा) येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात टेंभुर्णीच्या पोलिसांनी एका महिलेसह चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात रोहिणी कानिफनाथ कांबळे (वय ३२ रा.वेणेगाव) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दीपक सोमनाथ निचळ, सतीश तुकाराम निचळ, तुषार सतीश निचळ आणि सुनीता सतीश निचळ (सर्व रा.वेणेगाव ता.माढा) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. रोहिणी कांबळे यांचा मुलगा मंगळवारी सकाळी जि.प. शाळेत जाऊन फळयावर लिहीत होता. त्यावेळी सुनीता निचळ या भात शिजवणाऱ्या महिलेने त्याला शाळेचा बाहेर पाठवले. आणि त्याला परत शाळेत येऊ देऊ नका असे अन्य विद्यार्थ्यांना सांगितली होती. त्या नंतर मुलाने घरी जाऊन घडला प्रकार आईला सांगितला. तेंव्हा रोहिणी कांबळे या शाळेच्या आवारात जाब विचारण्यास गेल्या होत्या. तेंव्हा हिचे लय झाले, असे म्हणत दीपक निचळ याने त्यांना काठीने तर इतर तिघांनी त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली. अशी नोंद पोलीसात झाली. रोहिणी कांबळे यांचा मुलगा दुसऱ्या शाळेत शिकण्यात आहे. तो जिप शाळेत गेल्यानंतर त्याला स्वयंपाक करणाऱ्या सुनीता निचळ यांनी शाळेच्या बाहेर केले होते. असे पोलिसांकडून सांगण्यात आले. हवालदार सरडे पुढील तपास करीत आहेत.

**अपघातामधील जखमी दुचाकी चालकाचा मृत्यू**

सम्राटचौक परिसरातील रावजी सखाराम शाळेजवळ दुचाकी घसरून जखमी झालेले रवींद्र गजेंद्र ठोंबरे (वय ३५ रा.खेड ता. उत्तर सोलापूर) हे शासकिय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सकाळी मयत झाले. सोमवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास ते सम्राट चौक येथून बस स्थानकाच्या दिशेने निघाले होते. रावजी सखाराम शाळेजवळ दुचाकी घसरून ते गंभीर जखमी झाले होते. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

**मोडनिंब येथील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू**

मोडनिंब (ता.माढा) येथील एकनाला जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेत जखमी झालेले नागनाथ अंबादास जाडकर (वय ४६ रा.मोडनिंब) हे सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी पहाटे मयत झाले. ते शनिवार दि .१७ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास गावातून पायी घराकडे निघाले होते. एकनाला जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेत ते जखमी झाले होते. त्यांना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून दुसऱ्या दिवशी अजित (मुलगा) यांनी सोलापुरात दाखल केले होते. तालुका पोलिसात या अपघाताची नोंद झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



साहेब, त्या वेड्याचे वागणे कधी– कधी योग्य वाटतं!

कल्याण
688-24-356

मुंबई
459-81-290

## 'आमचा लाडका शेतकरी योजना' सुरू करणार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**सोलापूर/प्रतिनिधी**

**आमच्या सरकारचे काम म्हणजे शेतकऱ्याच्या पिकाला थेट मार्केट देण्याचं काम आहे. आमच्या सरकारचं एकच धोरण आहे, कष्टकरी, वारकरी सुखी शेतकरी अशा प्रकारचे आपण धोरण राबवत आहे. म्हणून मी आज तुम्हाला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आली, लाडका भाऊ योजना आली. या योजनांची आम्ही घोषणा केली, त्या योजना सुरूही केल्या. आता आम्ही 'आमचा लाडका शेतकरी योजना' सुरू करणार आहोत, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**

बीडमध्ये बुधवारी राज्य सरकारने कृषी महोत्सवाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित आहेत. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी या योजनेची घोषणा केली. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान हे देणारे आहेत. त्यामुळे आज मी त्यांच्याआधी बोलत आहे, मी शेतकऱ्यांसाठी त्यांच्याकडे काहीतरी मागणार आहे, असंही शिंदे म्हणाले. 'शेतकऱ्यांच्या बांधावर जाणारे आम्ही कार्यकर्ते आहोत, आम्ही ऑफिसमध्ये बसून फेसबुक लाईव्ह करणारे नाहीत. आम्ही बांधावर जातो, असा टोलाही सीएम शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला, शेतकऱ्यांवर दुहेरी संकट येत असतं. जेव्हा नुकसान होतं तेव्हा आम्ही मदत करताना नियम बाजूला ठेवतो. आमच्या महायुतीच्या सरकारने लगेच मदत देण्याचं काम सुरू केलं, असंही एकनाथ शिंदे म्हणाले.



### कांदा आणि दूध प्रश्नावर बैठक घेणार

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, एक रुपयात विमा योजना देणार हे राज्य पहिलं आहे. किसान सन्मान निधातून केंद्र आणि राज्यातून आपण मोठा निधी दिला आहे. आमही शेतकऱ्यांना दिलेलं कधीही काढत नाही. विरोधक म्हणतात शेतकऱ्यांना काय दिल? आम्ही हे कधीही काढत नाही. आज राज्यातील शेतकऱ्यांचा कांद्याचा आणि दुधाचा प्रश्न सोडवायचा आहे. यासाठी तुम्ही थोडा प्रयत्न करा, अशी विनंतीही एकनाथ शिंदे यांनी शिवराज सिंह चौहान यांच्याकडे केली. आमच्या शेतकऱ्यांच्या कापसाला आणि सोयाबिनला चांगला भाव मिळाला पाहिजे, सोयाबिनला हेक्टरी पाच हजार आणि कापसाला पाच हजार रुपये हेक्टरी देण्याचा निर्णय घेतोय. यात दोन हेक्टर पर्यंत मर्यादा असेल, अशी घोषणाही सीएम शिंदे यांनी केली. आपण साडे सात शेतीपंपाचे वीजबिलही माफ करत आहे, विरोधक मागच काय विचारत आहेत. आम्ही पुढचं बिल घेणार नाही, पुढचं का घेऊ. सरकार आता यापुढे शेतकऱ्यांकडून विजबिलाचे पैसे घेणार नाही, असंही शिंदे म्हणाले

## नाकोडा सनराईज सिटीत सोन्यासह रक्कम पळवली

**सोलापूर :** अज्ञात चोरट्याने न्यू मल्लिकार्जुन नगर येथील नाकोडा सनराईज सिटी येथील एका घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत घरातील सोने व रोख रक्कम असा एकूण ९४ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी घडली.याप्रकरणी गणेश सिद्धाराम नाडगुंडे (वय-३०,रा. नाकोडा सनराईज सिटी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास स.पो.नि. सोळुंके हे करीत आहेत.

## तरुणास मिरवणुकीत मारहाण

**सोलापूर :** मार्कंडेय रथ उत्सव मिरवणुकीमध्ये आशिष मनोज राठोड (वय-२०, रा.शिवशक्ती चौक) याला मारहाण करत डोक्यात दगड घातला ही घटना रोजी पोटफाळी चौक येथे घडली. आनंद धोत्रे, सतीश धोत्रे,विशाल भैरामंडी (सर्व रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.